नेपाळची झुंज अपयशी

इंग्लंडची चार धावांनी सरशी; जॅक्स, करनची चमकदार कामगिरी

अन्वय सावंत, लोकसत्ता

छाया : दीपक जोशी

मुंबई : 'आयसीसी'च्या सहयोगी (असोसिएट) सदस्य देशांनी अलीकडच्या काळात झपाट्याने प्रगती केली असून याचाच प्रत्यय यंदाच्या ट्वेन्टी-२० विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत येत आहे. स्पर्धेच्या पहिल्या दिवशी नेदरलँड्सने पाकिस्तानला, स्कॉटलंडने वेस्ट इंडिजला आणि अमेरिकेने भारताला कडवी झुंज दिली होती. स्पर्धेच्या दुसऱ्या दिवशी, रविवारीही हेच चित्र कायम राहिले. नेपाळच्या संघाने तुलनेने बलाढ्य इंग्लंडविरुद्ध अनपेक्षित विजयाची संधी निर्माण केली होती. मात्र, अखेरीस त्यांच्या प्रयत्नांना यश आले नाही.

मुंबईच्या वानखेडे स्टेडियमवर दुपारच्या सत्रात झालेल्या या सामन्यात चाहत्यांच्या मोठ्या पाठिंब्यासह नेपाळने इंग्लंडसमोर आव्हान उपस्थित केले. मात्र, अखेरच्या षटकांत फलंदाजीत विल जॅक्स (१८ चेंडूंत नाबाद ३९) आणि गोलंदाजीत सॅम करन (१/२७) यांच्या निर्णायक कामगिरीमुळे इंग्लंडने अवघ्या चार धावांनी विजय मिळवला. नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी स्वीकारल्यावर इंग्लंडने २० षटकांत ७ बाद १८४ धावा केल्या, मग नेपाळला ६ बाद १८० धावांवर रोखत स्पर्धेची विजयी सुरुवात केली.

आव्हानाचा पाठलाग करताना नेपाळने सलामीवीर आसिफ शेख (७) याला सुरुवातीलाच गमावले. अन्य सलामीवीर कुशाल भुरटेल (१७ चेंडूंत २९) आक्रमक सुरुवातीचे मोठ्या खेळीत रूपांतर करू शकला नाही. यानंतर कर्णधार रोहित पौडेल (३४ चेंडूंत ३९) आणि दीपेंद्र सिंह ऐरी (२९ चेंडूंत ४४) यांनी नेपाळला सावरून घेतले. त्यांनी ५४ चेंडूंत ८२ धावा जोडल्या. हे दोघे ठरावीक अंतराने बाद झाल्यावर लोकेश बाम याने (२० चेंडूंत नाबाद ३९) एका बाजूने अप्रतिम फटकेबाजी केली. नेपाळला १८ चेंडूंत ४६ धावांची आवश्यकता होती. त्यावेळी जोफ्रा आर्चरने टाकलेल्या १८व्या षटकात २२ धावा निघाल्या, मग १९व्या षटकात ल्युक वूडने १४ धावा खर्ची केल्या. त्यामुळे नेपाळला विजयासाठी केवळ १० धावांची आवश्यकता होती. मात्र, सॅम करनने अचूक 'यॉर्कर' टाकून लोकेशला फटकेबाजी करण्यापासून रोखले. अखेरच्या चेंडूवर सहा धावांची गरज असताना केवळ एकच धाव निघाल्याने नेपाळला हार पत्करावी लागली.

त्याआधी, प्रथम फलंदाजी करणाऱ्या इंग्लंडसाठी फिल सॉल्ट (१), जोस बटलर (२६) आणि टॉम बँटन (२) फारसे योगदान देऊ शकले नाहीत. मात्र, प्रतिभावंत डावखुरा फलंदाज जेकब बेथल (३५ चेंडूंत ५५) आणि कर्णधार हॅरी ब्रूक (३२ चेंडूंत ५३) यांनी नेपाळच्या गोलंदाजांवर प्रतिहल्ला करत इंग्लंडची धावगती आठच्या पुढेच ठेवली. अखेरच्या षटकांत हे दोघे बाद झाल्यानंतर इंग्लंडची धावसंख्या मर्यादित राहण्याची चिन्हे होती. मात्र, 'आयपीएल'मध्ये मुंबई इंडियन्सचे प्रतिनिधित्व करणाऱ्या विल जॅक्सने एक चौकार आणि चार षटकारांसह नाबाद ३९ धावा करत इंग्लंडला १८० धावांचा टप्पा ओलांडून दिला.

अखेरचे षटकच निर्णायक

या सामन्यात दोन्ही डावांतील अखेरचे षटकच निर्णायक ठरले. एकीकडे इंग्लंडची १९ षटकांत ६ बाद १६३ अशी धावसंख्या होती. मग केसी करनने टाकलेल्या डावातील अखेरच्या षटकात विल जॅक्सने तीन षटकार ठोकले आणि एकूण २१ धावा काढत इंग्लंडला १८४ धावांपर्यंत पोहोचता आले. दुसरीकडे, नेपाळने १९ षटकांअंती ६ बाद १७५ अशी मजल मारली होती. त्यामुळे अखेरच्या षटकात त्यांना १० धावांची आवश्यकता होती. परंतु डावखुरा वेगवान गोलंदाज सॅम करनने 'यॉर्कर'चा उत्कृष्ट वापर करत नेपाळच्या फलंदाजांना केवळ पाच धावा करू दिल्या. हाच दोन संघांतील मुख्य फरक ठरला.

संक्षिप्त धावफलक

इंग्लंड : २० षटकांत ७ बाद १८४ (जेकब बेथल ५५, हॅरी ब्रूक ५३, विल जॅक्स नाबाद ३९; दीपेंद्र सिंह ऐरी २/२३, नंदन यादव २/२५)

विजयी वि. नेपाळ : २० षटकांत ६ बाद १८० (दीपेंद्र सिंह ऐरी ४४, लोकेश बाम नाबाद ३९, रोहित पौडेल २९; लियम डॉसन २/२१, विल जॅक्स १/१७)

● **सामनावीर :** विल जॅक्स

'नेपाळमय' वानखेडे!

इंग्लंडविरुद्धच्या सामन्यात चाहत्यांचा पाठिंबा

अन्वय सावंत, लोकसत्ता

मुंबई : काही वर्षांपूर्वी नेपाळमधील कीर्तीपूर येथे विश्वचषक क्रिकेट स्पर्धेच्या पात्रता फेरीदरम्यान चाहत्यांनी तुडुंब भरलेले स्टेडियम, स्टेडियमबाहेर झाडांवर चढून सामना पाहणारे चाहते याची छायाचित्रे समाजमाध्यमांवर बरीच चर्चेत होती. त्या छायाचित्रांवरून नेपाळवासीयांचे क्रिकेटप्रेम अधोरेखित झाले होते. त्यांचे हे क्रिकेटप्रेम मुंबईत रविवारी झालेल्या इंग्लंडविरुद्धच्या सामन्यावेळीही अनुभवायला मिळाले.

ऐरवी 'इंडिया...इंडिया'च्या घोषणांनी दुमदुमणाऱ्या वानखेडे स्टेडियमवर या वेळी 'जय नेपाळ...जय नेपाळ'चा आवाज घुमत होता. नेपाळच्या चाहत्यांनी आपल्या संघाला भरघोस पाठिंबा दिला. प्रत्येक वेळी प्रतिस्पर्धी संघातील गडी बाद झाल्यानंतर, नेपाळच्या खेळाडूने चांगले क्षेत्ररक्षण केल्यानंतर किंवा फलंदाजाने मोठा फटका मारल्यानंतर त्यांच्या चाहत्यांनी मोठ्या उत्साहात त्यांचे कौतुक केले.

''नेपाळमध्ये फुटबॉल मोठ्या प्रमाणात पाहिले जाते. आता क्रिकेटलाही तशाच प्रकारे प्रेम आणि पाठिंबा मिळत आहे,'' असे नेपाळच्या एका चाहत्याने सांगितले. रविवारी गडद निळ्या आणि लाल रंगाच्या नेपाळ संघाच्या जर्सीने वानखेडेचा परिसर खुलून गेला होता. विशेषतः दिवेचा आणि शेजारील सुनील गावस्कर पॅव्हेलियनमध्ये चाहत्यांची संख्या मोठी होती.

''नेपाळ क्रिकेटने गेल्या काही वर्षांत झपाट्याने प्रगती केली आहे. यात माजी कर्णधार पारस खाडकाचे योगदान मोठे आहे. त्याने भक्कम पाया रचून दिल्यानंतर विद्यमान कर्णधार रोहित पौडेलने नेपाळ संघाची धुरा यशस्वीपणे सांभाळली आहे. आम्हाला लवकरच 'आयसीसी'चे पूर्ण सदस्यत्व मिळेल अशी आशा आहे,'' असे स्टेडियमबाहेर उपस्थित चाहत्यांकडून सामन्यापूर्वी सांगण्यात आले.

''विश्वचषकासाठी नेपाळहून हजारो चाहते भारतात आले आहेत. तसेच नेपाळचे अनेक लोक कामाच्या निमित्ताने भारतात वास्तव्यास आहेत. त्यामुळे आमच्या संघाला या वेळी मोठा पाठिंबा मिळणार यात शंका नाही,'' असे जवळपास ३५ वर्षांपासून मुंबईतच राहणाऱ्या नेपाळ संघाच्या चाहत्याने सांगितले. सामन्यानंतर नेपाळच्या खेळाडूंनी मैदानाला फेरी मारत चाहत्यांचे आभार मानले. नेपाळच्या संघाचे चारही साखळी सामने मुंबईतच असल्याने चाहते पुढेही मोठ्या संख्येने स्टेडियममध्ये उपस्थित राहतील, हे निश्चित आहे.

प्रत्यक्ष ताबा सूचना

ICICI Home Finance — नोंदणीकृत कार्यालय : आयसीआयसीआय बँक टॉवर्स, वांद्रे-कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पूर्व), मुंबई - 400051. कॉर्पोरेट कार्यालय : आयसीआयसीआय एचएफसी टॉवर, जेबी नगर, अंधेरी कुर्ला रोड, अंधेरी पूर्व, मुंबई - 400 059. शाखा कार्यालय : दुसरा मजला, कार्यालय क्र. 203, साई मिडास, पटियाला हाऊस समोर, नगर मनमाड रोड, सावेडी, अहमदनगर- 414003.

ज्याअर्थी, निम्नस्वाक्षरीकार हे आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड चे प्राधिकृत अधिकारी असून त्यांनी सिक्युरीटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शिअल ॲसेट्स अँड एनफोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 अंतर्गत आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेन्ट) रुल्स, 2002 च्या नियम 3 सह वाचण्यात येणाऱ्या अनुच्छेद 13 (12) अंतर्गत बहाल करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करीत, खाली नमूद केलेल्या कर्जदारांना मागणी सूचना पाठवली ज्यात त्यांना सूचना प्राप्त होण्याच्या दिनांकापासून 60 दिवसांचे आत सूचनेमध्ये नमूद रकमेचा भरणा करण्याचे आवाहन करण्यात आले होते.

कर्जदार सदर रकमेची परतफेड करण्यात असमर्थ ठरल्याने कर्जदार व सर्वसामान्य जनतेस सूचित करण्यात येते की निम्नस्वाक्षरीकारांनी सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स, 2002 मधील नियम 8 सह वाचण्यात येणाऱ्या सदर अधिनियमाच्या अनुच्छेद 13(4) अंतर्गत बहाल करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करीत खाली वर्णन केलेल्या मालमत्तेचा खालील नमूद दिनांकास ताबा घेतलेला आहे.

कर्जदार व सर्वसामान्य जनतेस याद्वारे सावधगिरीची सूचना देण्यात येते की त्यांनी सदर मालमत्तेच्या संदर्भात कोणताही व्यवहार करू नये आणि असा कोणताही व्यवहार केल्यास तो आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड यांच्या रकमेच्या भाराधीन असेल. उपरोक्त कर्जदार / सह-कर्जदारांनी सदर तारण मालमत्तेचा ताबा नाकारल्याबद्दलचा पंचनामा रीतसर नियुक्त केलेल्या प्राधिकृत अधिकाऱ्याद्वारे दाखल केला आहे.

कर्जदार यांचे लक्ष या कायद्याच्या कलम 13 च्या उप-कलम (8) च्या तरतुदींकडे, उपलब्ध वेळेच्या संदर्भात, मालमत्तेची सुरक्षित पूर्तता करण्यासाठी आमंत्रित केले जाते.

अ. क्र.	कर्जदार / सह-कर्जदार यांचे नाव / कर्ज खाते क्रमांक -	मालमत्तेचे वर्णन / ताबा दिनांक	मागणी सूचना दिनांक / मागणी सूचनेतील रक्कम (रु.)	शाखेचे नाव
1.	सुनील बाबुराव डहाळे (कर्जदार), सोनाली सुनील डहाळे (सह-कर्जदार), LHADR00001323909.	फ्लॅट क्र. एफ-01, पहिला मजला, मोजमाप 700 चौरस फूट, भानगे कॉम्प्लेक्स पाटीलबा नगर राजूर रोड, मु.पो. कोल्हार तालुका, राहाता जि, प्लॉट क्र. 50, भाग अहमदनगर, गट क्र. 32/ए/2, मिळकत क्र. 2752/6 अहमदनगर महाराष्ट्र 413710 (सन्दर्भ कर्ज खाते क्र. LHADR00001323909). चतुःसीमा - उत्तरः फ्लॅट क्र. एफ-02, दक्षिणः खुला प्लॉट, पूर्वः खुला प्लॉट, पश्चिमः फ्लॅट क्र. एफ-4 आणि सामायिक जिना. / ताबा दिनांक - 04/02/2026.	12-01-2024 रु. 12,88,223/-	अहमदनगर

वर नमूद केलेल्या कर्जदार / जमीनदारांना याद्वारे रक्कम परत करण्यासाठी 30 दिवसांची सूचना देण्यात येत आहे, अन्यथा सुरक्षा हित (अंमलबजावणी) नियम 2002 च्या नियम 8 आणि 9 अंतर्गत तरतुदींनुसार ही सूचना प्रकाशित झाल्यापासून 30 दिवसांच्या समाप्तीनंतर तारण ठेवलेल्या मालमत्तेची विक्री केली जाईल.

दिनांक : 09 फेब्रुवारी 2026 — प्राधिकृत अधिकारी,

ठिकाण : अहमदनगर — आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड

भारत-पाकिस्तान सामन्यासाठी सर्वंकष प्रयत्नांना वेग

कराची : पाकिस्तान सरकारच्या भारताविरुद्ध सामना न खेळण्याच्या प्रस्तावित बहिष्कारावरून निर्माण झालेला तिढा सोडविण्यासाठी सर्वंकष प्रयत्नांना आता वेग आला आहे. आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेचे (आयसीसी) उपाध्यक्ष इम्रान ख्वाजा पाकिस्तान क्रिकेट मंडळाच्या (पीसीबी) अधिकाऱ्यांची भेट घेण्यासाठी पाकिस्तानात दाखल झाले आहेत.

'आयसीसी'मध्ये सिंगापूरचे प्रतिनिधित्व करणारे ख्वाजा यांना जागतिक नियामक मंडळात विशेष महत्त्व असून, सहयोगी सदस्य संचालक म्हणून त्यांना मंडळावर मतदानाचा अधिकार आहे. भारत आणि पाकिस्तान यांच्यातील सामना होण्याच्या दृष्टीने प्रयत्न करण्यासाठी 'आयसीसी'ने ख्वाजा यांची मध्यस्थ म्हणून निवड केली आहे. पाकिस्तान सरकारने केवळ भारताशी न खेळण्याचे आदेश दिल्यापासून सध्या सुरू असलेल्या ट्वेन्टी-२० विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत वेगळाच व्यवस्थापकीय प्रश्न उपस्थित झाला आहे.

न्यूझीलंडच्या विजयात सेफर्टची छाप

चेन्नई : टीम सेफर्टच्या (६५ धावा) अर्धशतकाच्या जोरावर न्यूझीलंडने ट्वेन्टी-२० विश्वचषक क्रिकेट स्पर्धेतील सामन्यात अफगाणिस्तानवर पाच गडी राखून विजय मिळवला. १८३ धावांच्या आव्हानाचा पाठलाग न्यूझीलंडने १७.५ षटकांत ५ बाद १८३ धावा करत विजय साकारला.

NATIONAL INSURANCE ACADEMY

25, Balewadi, Baner Road, NIA P.O., Pune 411045
Tel.: +91-20-27204000, 27204444
Website: www.niapune.org.in

E-TENDER NOTICE

National Insurance Academy, Pune invites e-tenders for the following:

- Annual Maintenance Contract of Electrical, Audio, HVAC and Civil Installations at NIA campus.
- Annual Maintenance Contract for providing Gardening Services at NIA Campus.
- Annual Rate Contract of Painting Work at NIA Campus by Brand Applicators.

For further details regarding the above and other tenders, quotations, and information, please visit **https://niapune.org.in/tenders** and e-tender portal **https://www.tenderwizard.com/NIA**

Director

pnb Housing Finance Limited — Ghar Ki Baat

परिशिष्ट - IV-A - अचल मालमत्तेची ई-लिलाव-जाहीर विक्री सूचना

सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स, 2002 मधील नियम 8(6) च्या तरतुदींसह वाचण्यात येणाऱ्या सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शीअल ॲसेट्स अँड एनफोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 अंतर्गत अचल मत्तांच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना.

नोंदणीकृत कार्यालय :- 9वा मजला, अंतरीक्ष भवन, 22 कस्तुरबा गांधी मार्ग, नवी दिल्ली - 110001, फोन्स :- 011-23357171, 23357172, 23705414, वेब. :- www.pnbhousing.com

शाखा अहमदनगर : युनिट क्र. 203, दुसरा मजला, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, पंचशील हॉटेलजवळ, सावेडी, अहमदनगर, महाराष्ट्र - 414003.

याद्वारे खाली स्तंभ क्र. - ए मध्ये नमूद कर्जदार व जामीनदारांना आणि सर्व लोकांना सूचित करण्यात येते की सुरक्षित धनकोकडे तारण / भारग्रस्त असलेल्या खाली स्तंभ - डी मध्ये नमूद अचल मालमत्तेचा **मे. पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड** / सुरक्षित धनको च्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी रचनात्मक / प्रत्यक्ष ताबा घेतलेला असून (स्तंभ इ सी मध्ये नमूद केल्यानुसार) त्यांची ''जशी आहे जेथे आहे'' आणि ''जशी आहे जे काही आहे'' आणि ''तेथे जे काही आहे'' तत्त्वावर खाली नमूद तपशिलानुसार विक्री करण्यात येईल. याद्वारे ही सूचना सद्य दिनांकास सुधारित सिक्युरिटी इंटरेस्ट एनफोर्समेंट रुल्स, 2002 मधील नियम इ 8(6) व 9 अंतर्गत स्तंभ क्र. ए मध्ये नमूद करण्यात आलेल्या कर्जदार / गहाणदार / कायदेशीर वारस, कायदेशीर प्रतिनिधी (ज्ञात किंवा अज्ञात), संबंधित कर्जदार / गहाणदारांच्या (मयत झाले असल्यास) मृत्युपत्रव्यवस्थापक, प्रशासक, वारसदार, अभिहस्तांकिती यांना देऊ करण्यात येत आहे. विक्रीच्या अटी व शर्तीच्या तपशीलासाठी कृपया मे. पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड / सुरक्षित धनकोच्या वेबसाईटला www.pnbhousing.com येथे भेट द्यावी.

कर्ज क्र., कर्जदार /सह-कर्जदार / जामीनदार / कायदेशीर वारस यांचे नाव (ए)	मागणी केलेली रक्कम व दिनांक (बी)	ताब्याचे स्वरूप (सी)	तारण मालमत्तेचे वर्णन (डी)	आरक्षित किंमत (आ. कि.) (ई)	बयाणा रक्कम (आ. कि. च्या 10%) (एफ)	बोली सादर करण्याचा शेवटचा दिनांक (जी)	बोली वृद्धी दर (एच)	पाहणीचा दिनांक व वेळ (आय)	लिलावाचा दिनांक व वेळ (जे)	असल्यास, ज्ञात बोजे / न्यायालयीन कज्जे (के)
HOU/AHMD/1121/926331 / NHL/AHMD/0123/1075531, नवनाथ ठकाजी हुलावळे / विजया नवनाथ हुलावळे, शाखा : अहमदनगर	रु. 17,64,893.89 आणि 13-03-2025	प्रत्यक्ष ताबा	स. क्र. 74/2ए, प्लॉट क्र. 11 ते 13/4, पूर्व बाजूचा रो ब्लॉक, क्र. बी जिजाऊ नगर, अरुणोदय सिटी मागे, सावेडी, बोल्हेगाव रोड, बोल्हेगाव, अहमद नगर, महाराष्ट्र-414111, भारत.	रु. 14,85,000	रु. 1,48,500	11/03/2026	रु. 10,000	17-02-2026 रोजी दुपारी 12:00 ते दुपारी 04:00 दरम्यान	12-03-2026 रोजी दुपारी 02:00 ते दुपारी 03:00 दरम्यान	ज्ञात नाही

*सोबत भरण्याच्या व / वा वसुलीच्या दिनांकापर्यंतचे लागू असेल त्यानुसार वार्षिक 18% दराने पुढील व्याज, आनुषंगिक खर्च, शुल्के, अधिभार इ. **पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड च्या प्राधिकृत अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार वर स्तंभ - के मध्ये जाहीर केलेल्या माहितीशिवाय वर नमूद अचल / अनामत मत्तांच्या संदर्भात इतर कोणतेही बोजे / दावे नाहीत. याशिवाय असे कुठलेही बोजे असल्यास यशस्वी खरेदीदाराने / बोलीदाराने ते स्वतः भरावयाचे आहेत. संभाव्य खरेदीदार / बोलीदारांना विनंती आहे की त्यांनी वर नमूद बोज्यांची स्वतंत्रपणे चौकशी करावी. (1) आज दिनांकास वर नमूद अचल मालमत्ता / अनामत मत्तांची विक्री करणे, त्यांची विल्हेवाट लावणे इ. पासून पीएनबीएचएफएल / पीएनबीएचएफएल च्या प्राधिकृत अधिकाऱ्यांना प्रतिबंध करणारा कोर्टाचा कोणताही हुकूम नाही आणि स्थितीचा उल्लेख स्तंभ क्र. - के मध्ये केला आहे. (2) संभाव्य खरेदीदारांनी / बोलीदारांनी आणि इच्छुकांनी स्तंभ - के मध्ये नमूद केलेल्या प्रक्रिया / आदेश इ. मधील बाजूची स्वतंत्रपणे चौकशी करावी. यात पीएनबीएचएफएल यांचेकडे उपलब्ध असलेल्या दस्तावेजांच्या मालकी हक्काचा समावेश आहे, परंतु ते तेथेपर्यंतचे मर्यादित नसून त्यांनी निविदा / बोली अर्ज सादर करण्याआगोदर किंवा प्रस्ताव देण्याआगोदर सर्व बाबतीत चौकशी करून घ्यावी. बोलीदाराने या लिलावाच्या अटी व शर्तींवर बोली फॉर्मसह स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. (3) कृपया लक्षात घ्यावे की सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स, 2002 मधील नियम 9(3) च्या अनुषंगाने बोलीदार / खरेदीदार विक्री किमतीच्या 25% एवढी रक्कम (जमा केलेली बयाणा रक्कम धरून) त्याच दिवशी किंवा फार तर पुढील कामकाजाच्या दिवशी सादर करण्यास बांधील आहे. सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स, 2002 मधील नियम 9(2) नुसार सुरक्षित धनकोस विक्री किमतीच्या 25% एवढी रक्कम प्राप्त झाल्यावरच विक्री बोलीदाराच्या नावे निश्चित करण्यात येईल. विक्री रकमेपैकी उर्वरित 75% रक्कम खरेदीदारास विक्रीच्या निश्चितीच्या पावतीच्या दिनांकापासून 15 दिवसांचे आत जमा करावी लागेल अन्यथा अशा ठेवी चुकवल्यास, प्राधिकृत अधिकारी विक्रीच्या पुष्टीकरण पत्रात नमूद केलेल्या 15 दिवसांच्या अनिवार्य कालावधीच्या समाप्तीच्या तारखेपासून 15 दिवसांच्या आत विक्रीच्या मोबदल्याच्या रकमेचे काही भाग जप्त करेल आणि मालमत्ता / अनामत मत्तेची पुनर्विक्री करण्यात येईल. (4) सी1 इंडिया प्रायव्हेट लिमिटेड हे प्राधिकृत अधिकाऱ्यांना ई-लिलावाच्या माध्यमातून विक्रीची प्रक्रिया राबविण्यास मदत करतील. ज्याचे कॉर्पोरेट कार्यालय प्लॉट क्र. 68, तिसरा मजला, सेक्टर 44, गुडगाव, हरियाणा 122003, वेबसाइट - www.bankeauctions.com, मालमत्तेची तपासणी किंवा बोली दस्तऐवज मिळविण्याशी संबंधित कोणत्याही सहाय्यासाठी आणि इतर कोणत्याही प्रश्नासाठी किंवा नोंदणीसाठी, पीएनबीएचएफएल चे प्राधिकृत व्यक्ती - श्री. गणेश अंकुश / नीलाक्षी पाटील, टोल फ्री क्र. : 1800 120 8800, ई-मेल : auction@pnbhousing.com, यांचेशी संपर्क साधावा किंवा www.pnbhousing.com येथे भेट द्यावी.

ठिकाण :- अहमदनगर. दिनांक :- 09.02.2026 — स्वा./- प्राधिकृत अधिकारी, पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड

homefirst — We'll take you home

Home First Finance Company India Limited
CIN: L65990MH2010PLC240703
Website: homefirstindia.com
Phone No.: 180030008425 Email ID: loanfirst@homefirstindia.com

ताबा सूचना

संदर्भ : सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेन्ट) रुल्स, 2002 च्या नियम 8 च्या उप-नियम (1) अंतर्गत ताबा सूचना.

ज्याअर्थी, निम्नस्वाक्षरीकार हे **होम फर्स्ट फायनान्स कंपनी इंडिया लिमिटेड** चे प्राधिकृत अधिकारी असून त्यांनी सिक्युरीटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शिअल ॲसेट्स अँड एनफोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 (2002 चा अधिनियम क्र. 54) अंतर्गत आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेन्ट) रुल्स, 2002 च्या नियम 3 सह वाचण्यात येणाऱ्या सदर अधिनियमाच्या अनुच्छेद 13(2) अंतर्गत बहाल करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करीत एक मागणी सूचना निर्गमित केली ज्यात त्यांना सदर सूचना प्राप्त होण्याच्या दिनांकापासून तुम्हाला / कर्जदारांना, खालील नावाच्या व्यक्तीला **60 दिवसांचे आत** थकबाकी भरण्याचे आवाहन केले आहे. कर्जदार सदर रकमेचा भरणा दिलेल्या वेळेत करण्यात असमर्थ ठरले म्हणून **होम फर्स्ट फायनान्स कंपनी इंडिया लिमिटेड** ने, सरफेसी कायदा, 2002 च्या कलम 13 च्या उप कलम (4) च्या तरतुदीनुसार प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करीत **खाली नमूद मालमत्तेचा ताबा घेतलेला आहे.**

अ. क्र.	कर्जदार / सह-कर्जदार / जामीनदारांचे नाव	तारण मालमत्तेचे वर्णन	मागणी सूचना दिनांक	मागणी सूचनेच्या दिनांकानुसार एकूण थकबाकी (रु. मध्ये)	ताबा दिनांक
1.	नंदकुमार पोपटराव पवार, जनाबाई पोपट पवार, सोनाली नंदकुमार पवार	दुकान - गट क्र. 288, प्लॉट क्र. 115+116+117+130+131+132, दुकान क्र. 121 आणि दुकान क्र. 108 आणि दुकान क्र. 116 सुपा, अहमदनगर, महाराष्ट्र-414001. चतुःसीमा : दुकान-108 :- पूर्व - रस्ता, दक्षिण - पारनेर रस्ता आणि पार्किंग, पश्चिम - दुकान क्र. 107, उत्तर - दुकान क्र. 112. दुकान क्रमांक 116 :- पूर्व - रस्ता, दक्षिण - गाळा क्र. 112, पश्चिम - गाळा क्र. 115, उत्तर - गाळा क्र. 121. दुकान क्रमांक 121 :- पूर्व - रस्ता, दक्षिण - दुकान क्र. 116, पश्चिम - दुकान क्र. 120, उत्तर - रस्ता.	04-12-2025	2,794,501	05-02-2026
2.	रुषिकेश बाळासाहेब राजगुरू, बाळासाहेब गंगाधर राजगुरू	दुकान - दुकान क्र. 27, 28, 29, दुसरा मजला, साई सुपर मार्केट फेज 1, विंग सी, सीटीएस क्र. 230 ते 243, 254, 255, 257, 258, 260, 261 भाग, 262 आणि 263, टी.पी. योजना क्र. 742 भाग आणि 746 भाग, मु.पो. श्रीरामपूर, मेन रोड श्रीरामपूर, श्रीरामपूर, महाराष्ट्र-413709. चतुःसीमा : पूर्वेला - दुकान क्र. 30, पश्चिमेला - जिना आणि लिफ्ट, दक्षिणेला - सामायिक जागा, उत्तरेला - खुले क्षेत्रफळ.	04-12-2025	2,070,459	05-02-2026
3.	प्रशांत रमेश लावरे, नलिनी रमेश लावरे, विशाल देविदास कापडे	फ्लॅट - 401, बोल्ड क्र. 5, विंग - बी, म्हाडा श्रीरामपूर शहर, चौथा मजला, सर्व्हे क्र. 52/150, 52/151, 52/152, 54/1, 63, 63/1, 63/2, 64/164/1 65/1 ते 2, बोरावके नगर, श्रीरामपूर, श्रीरामपूर, महाराष्ट्र-413709. चतुःसीमा : पूर्व - आकाशाकडे खुले, दक्षिण - आकाशाकडे खुले, पश्चिम - फ्लॅट क्र. बी-402, उत्तर - जिना आणि फ्लॅट क्र. बी-404.	04-12-2025	1,412,505	05-02-2026

कर्जदार रक्कम परतफेड करण्यात अयशस्वी झाल्यामुळे, याद्वारे कर्जदार / जामीनदार आणि सर्वसाधारणपणे जनतेला सूचना दिली जाते की खाली स्वाक्षरीकाराने वर नमूद केलेल्या तारखेला उक्त अधिनियमाच्या नियम 8 सह वाचलेल्या कलम 13(4) अंतर्गत त्याला / तिला प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून खाली वर्णन केलेल्या मालमत्तेचा ताबा घेतला आहे.

कर्जदार / जामीनदार तसेच आम जनतेस याद्वारा सावध करण्यात येते की त्यांनी वरील संदर्भित मालमत्ता / सुरक्षित मत्ता किंवा त्यावरील कोणत्याही भागासंबंधित व्यवहार करु नये आणि उक्त मालमत्ता / सुरक्षित मत्तेबाबत केलेला कोणताही व्यवहार मालमत्ता / सुरक्षित मत्तेच्या अनुसार यावरील नमूद केलेल्या रकमेकरिता होम फर्स्ट फायनान्स कंपनी इंडिया लिमिटेड च्या आकाराच्या विषयाधीन असेल, जी रक्कम पूर्णतः प्रदान होईपर्यंत त्यावरील पुढील व्याजासह देय आहे.

उपलब्ध वेळेत सुरक्षित मत्तेच्या विमोचनाकरिता कायद्याच्या कलम 13 च्या पोट-कलम (8) च्या तरतुदींकडे कर्जदारांचे लक्ष वेधीत आहोत.

ठिकाण : अहमदनगर — प्राधिकृत अधिकारी,

दिनांक : 09-02-2026 — होम फर्स्ट फायनान्स कंपनी इंडिया लिमिटेड

वृद्धीसाठी उत्साह, उत्कृष्टतेची ओढ.

आपत्काले रक्षिष्यामि — GIC Re

निव्वळ संपत्ती
31.12.2025: ₹48,490.40 कोटी
31.12.2024: ₹40,745.48 कोटी

एकुण प्रीमियम
31.12.2025: ₹32,976.26 कोटी
31.12.2024: ₹30,786.87 कोटी

सॉल्वन्सी रेशिओ
31.12.2025: 3.87%
31.12.2024: 3.52%

31 डिसेंबर 2025 रोजी संपलेल्या तिमाही आणि नऊ माहिचे वित्तीय परिणाम

(₹ कोटी मध्ये)

अनु. क्र.	तपशील	स्वतंत्र: संपलेली तिमाही (तीन महिने) (31/12/2025) पुनरावलोकन	स्वतंत्र: वर्ष ते तारखेचे आकडे (नऊ महिने) (31/12/2025) पुनरावलोकन	स्वतंत्र: मागील वर्षात संपलेल्या संबंधित तीन महिने (31/12/2024) पुनरावलोकन	एकत्रित: संपलेली तिमाही (तीन महिने) (31/12/2025) पुनरावलोकन	एकत्रित: वर्ष ते तारखेचे आकडे (नऊ महिने) (31/12/2025) पुनरावलोकन	एकत्रित: मागील वर्षात संपलेल्या संबंधित तीन महिने (31/12/2024) पुनरावलोकन
1.	ऑपरेशन्समधून एकूण उत्पन्न $	10,986.55	32,976.26	9,967.71	11,083.46	33,206.85	10,105.73
2.	कालावधीसाठी निव्वळ नफा / (तोटा) (करपूर्व, अपवादात्मक आणि/किंवा असाधारण बाबी#)	2,116.93	7,833.24	2,168.69	2,360.32	8,339.09	2,183.80
3.	करपूर्व कालावधीसाठी निव्वळ नफा / (तोटा) (अपवादात्मक आणि/किंवा असाधारण वस्तूंनंतर#)	2,116.93	7,833.24	2,168.69	2,360.32	8,339.09	2,183.80
4.	कर नंतरच्या कालावधीसाठी निव्वळ नफा / (तोटा) (अपवादात्मक आणि/किंवा असाधारण वस्तूंनंतर#)	1,518.92	6,137.94	1,621.35	1,725.66	7,129.79	1,676.62
5.	कालावधीसाठी एकूण व्यापक उत्पन्न [या कालावधीसाठी नफा/(तोटा) (करानंतर) आणि इतर व्यापक उत्पन्न (करानंतर) समाविष्ट आहे]	1,518.92	6,137.94	1,621.35	1,725.66	7,129.79	1,676.62
6.	इक्विटी शेअर कॅपिटल	877.20	877.20	877.20	877.20	877.20	877.20
7.	मागील वर्षाच्या ऑडिट केलेल्या ताळेबंदात दाखवल्याप्रमाणे राखीव निधी (पुनर्मूल्यांकन राखीव निधी वगळून)	49,813.34	49,813.34	40,968.33	55,029.35	55,029.35	44,384.60
8.	प्रति शेअर कमाई (प्रत्येकी ₹5/-) (चालू आणि बंद केलेल्या ऑपरेशन्ससाठी)						
	1. मूलभूतः	8.66	34.99	9.24	9.84	40.64	9.56
	2. विभाजीत केलेले	8.66	34.99	9.24	9.84	40.64	9.56

नोंदः

अ. वरील माहिती सेबी (लिस्टिंग आणि इतर प्रकटीकरण आवश्यकता) नियमावली, 2015 च्या नियम 33 अंतर्गत स्टॉक एक्सचेंजकडे दाखल केलेल्या तिमाही आणि वर्ष ते तारीख आर्थिक निकालांच्या तपशीलवार स्वरूपाचा उतारा आहे. लेखापरीक्षकाच्या अहवालासह तिमाही आणि वर्ष ते तारीख आर्थिक निकालांचे संपूर्ण स्वरूप स्टॉक एक्सचेंजच्या वेबसाइट्स **(www.bseindia.com)** आणि **(www.nseindia.com)** वर उपलब्ध आहे आणि कॉर्पोरेशनच्या वेबसाइटवर **(https://www.gicre.in/en/investors-public-disclosures/investors-en/financial-performance/financial-results)** पोस्ट केले आहे आणि QR कोड स्कॅन करून ते ॲक्सेस करता येईल.

ब. $ ऑपरेशन्समधून मिळणारे एकूण उत्पन्न हे एकूण लिखित प्रीमियम, पुनर्विम्याचे एकूण उत्पन्न आणि लागू करांचे निव्वळ आहे.

क. # भारतीय लेखा मानके (IND AS) सध्या भारतातील विमा कंपन्यांना लागू नाहीत.

ठिकाणः मुंबई

दिनांक : 07.02.2026

भारतीय सर्वसाधरण विमा महामंडळाच्या वतीने

वर प्रदर्शित करण्यात आलेला जीआयसी री ट्रेड लोगो हा जीआयसी री यांच्या मालकीचा आहे आणि जीआयसी री द्वारा त्याचा परवान्यांतर्गत उपयोग करण्यात येत आहे. ''सुरक्षा'', 170, जमशेदजी टाटा मार्ग, चर्चगेट, मुंबई-400 020, भारत. दूरध्वनी (बोर्ड): +91 22 2286 7000 सीआयएन क्र.: L67200MH1972G01016133, आयआरडीएआय नोंदणी क्र. 112, वेबसाईट: www.gicre.in

सही/-
हितेश जोशी
ईडी (सीएमडीचा अतिरिक्त कार्यभार)
DIN: 09322218

भारतीय सर्वसाधारण विमा महामंडळ

'सुरक्षा', 170, जमशेदजी टाटा मार्ग, चर्चगेट, मुंबई 400 020, भारत । टेलिफोन (बोर्ड): +91 22 2286 7000 • ईमेल: investors.gic@gicre.in

आयआरडीएआय नोंदणी क्र.: 112 | सीआयएन क्र.: L67200MH1972GOI016133 | www.gicre.in

हे पत्र **वैदेही ठकार** यांनी मालक द इंडियन एक्स्प्रेस (पी) लिमिटेड (आधीचे नाव - द इंडियन एक्स्प्रेस लिमिटेड), यांच्यासाठी इंडियन एक्स्प्रेस प्रेस, ई -२५, एम.आय.डी.सी., वाळुंज, छत्रपती संभाजीनगर येथे छापून १६४, अंबर प्लाझा, स्टेशन रोड, अहिल्यानगर-४१४ ००१ येथे प्रसिद्ध केले. **संपादकीय/ जाहिरात/ वितरण :** १६४, अंबर प्लाझा, स्टेशन रोड, अहिल्यानगर-४१४ ००१. दूरध्वनी- ०२४१-२४५१९०७, २४५१५४४, फॅक्स : ०२४१-२४५१६०७. **लोकसत्ता कार्यालय :** मफतलाल सेंटर, सातवा मजला, रामनाथ गोएंका मार्ग, नरिमन पॉइंट, मुंबई-४०० ०२१. दूरध्वनी : २२०२२६२७/६७४४००० फॅक्स : २२८२२१८७. महापे कार्यालय : प्लॉट नं. ईएल १३८, टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, महापे, नवी मुंबई-४०० ७१०. दूरध्वनी : ०२२-२७६३९१००; फॅक्स : ०२२-२७६३३००८. **पुणे कार्यालय :** एक्स्प्रेस हाऊस, प्लॉट नं. १२०५ /२/६, शिरोळे रस्ता, शिवाजीनगर, पुणे - ४११ ००४ . दूरध्वनी : ०२०-६७२४१०००. **नागपूर कार्यालय :** प्लॉट. न. ३८, अॅडिसन ट्रेड सेंटर, पहिला मजला, डागा ले-आऊट (अंबाझरी) नागपूर-४४००१०. दूरध्वनी : ०७१२-२२३०४२१, २२३६८९७. ■ **अध्यक्ष, संचालक मंडळ : विवेक गोएंका** ■ **कार्यकारी प्रकाशक : वैदेही ठकार** ■ **संपादक : गिरीश कुबेर** ■ **निवासी संपादक : सिद्धार्थ केळकर*** (* पी.आर.पी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे.) Regd. No. RNI 57133/94 © द इंडियन एक्स्प्रेस (पी) लिमिटेड. सर्व हक्क सुरक्षित. लेखी अनुमतीशिवाय संपूर्ण अथवा अंशतः पुनःप्रकाशनास वा पुनःप्रसारणास मनाई.